आधुनिक विचारांचे
# वर्तमान

जागतिक महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव. खरं तर रोजचा दिवस प्रत्येक स्त्रीचा असतो. तिच्या आत्मसन्मानाचा आणि तिच्या कसोटीचाही. केवळ ती स्त्री आहे म्हणून भोगाव्या लागणाऱ्या वेदनेचा आणि ती स्त्री आहे म्हणूनच अनुभवता येणाऱ्या सर्जनत्वाचाही.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्व भगिनींना हार्दिक शुभेच्छा..!

: संपादक



बीड । मंगळवार, ८ मार्च २०२२ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : १८ । पाने : ४ । मूल्य २ ₹





# महिलांना समाजातून प्रोत्साहन मिळणे गरजेचे

## जिल्हाधिकारी राधबिनोद शर्मा ; उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार

बीड : मुलगा मुलगी असा भेद न करता दोघांकडे समान नजरेने पाहिले पाहिजे. आपल्या राज्यात जास्तीत जास्त महिलांनी मोठ–मोठ्या पदावर जबाबदारीची कामगिरी पार पाडली आहे. स्त्री कुठल्याही क्षेत्रात आपली तिला दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडू शकते. पण तिला समाजातून प्रोत्साहन मिळणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद महिला व बालविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नियोजन भवन येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, उपजिल्हाधिकारी नीलिमा बाफना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, प्रदीप काकडे, अतिरीक्त पोलीस अधीक्षक अंबाजोगाई कविता नेरकर, पोलीस उपअधीक्षक श्रीपाद परोपकारी, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञा तरकसे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) प्रमोद काळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी चंद्रशेखर केकाण, गटविकास अधिकारी मीना कांबळे, बालविकास प्रकल्प अधिकारी सुनंदा तांदळे यांच्यासह विविध क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्यातील कोरोना संक्रमण काळात तसेच विविध क्षेत्रांमधून उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा जिल्हाधिकारी राधबिनोद शर्मा यांच्या हस्ते स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा व मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना जागतिक महिला दिनानिमित्त पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा व मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांचे सन्मान चिन्ह देवून स्वागत करण्यात आले.

तुषार ठोंबरे म्हणाले, स्त्री जन्माला येत नाही तर ती घडवली जाते. कारण मुलगी जन्माला आल्यापासून आपण तिला फक्त स्त्रीची कामे शिकवतो. परंतु मुलगा जन्माला आला तर आपण त्याला तशी कामे शिकवत नाही. म्हणून मुलगी असो वा मुलगा आपण दोघांनाही एक समान कामे शिकवली पाहिजेत. महिलांचा आजच्याच दिवशी सन्मान करण्याऐवजी त्यांना दररोज सन्मानाची वागणूक दिली पाहिजे.

उपविभागीय नीलिमा बाफना, अतिरीक्त पोलीस अधीक्षक कविता नेरकर व अंगणवाडी सेविका वैशाली प्रधान यांनी सत्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त केले.

## जिल्हा रुग्णालयात महिला डॉक्टर्स, परिचारीकांचा सन्मान

प्रतिनिधी

बीड :जागतिक महिला दिनानिमित्त येथील जिल्हा रुग्णालयात महिला डॉक्टर्स, परिचारीका व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा, प्रशिक्षणार्थी पोलिस अधीक्षक रश्मीता राव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे, डॉ.राम आवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांना योग्य संधी मिळाली तर त्यांचे कार्य कर्तृत्व त्या सिद्ध करुन दाखवतात. कोविड १९ च्या प्रादुर्भावामध्ये व अन्य सर्व रुग्णसेवेमध्ये जिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी, अधिसेविका, परिचारीका तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनी केलेल्या उल्लेखनिय कामानिमित्त जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी सुरुची भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ.राजश्री शिंदे, डॉ.जयश्री बांगर, डॉ.स्नेहल मेंगडे उपस्थित होत्या.



